# मोशी डेपोत कचऱ्यापासून वीजनिर्मिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पिंपरी :** वाढती लोकसंख्या, विजेची वाढती मागणी आणि कचऱ्याचे वाढणारे प्रमाण लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड महापालिकेने मोशीतील कचरा डेपोमध्ये कचऱ्यापासून वीजनिर्मिती (वेस्ट टू एनर्जी) हा अत्याधुनिक प्रकल्प उभारला आहे. या प्रकल्पाद्वारे दररोज १४ मेगावॅट वीजनिर्मिती होणार असून, सातशे टन सुक्या कचऱ्याची विल्हेवाट लागणार आहे. या प्रकल्पाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १ ऑगस्ट रोजी उद्घाटन होणार आहे.

शहरात दररोज निर्माण होणारा सुमारे ७०० टन सुका, ४०० टन ओला असा एकूण ११०० मेट्रिक टन कचरा मोशी कचरा डेपोमध्ये जातो. कचरा टाकण्यासाठी सुमारे ८१ एकर जागा १९९१ पासून महापालिकेच्या ताब्यात आहे. त्या ठिकाणी मेकॅनिकल कंपोस्टिंग, गांडूळ खत प्रकल्प, प्लॅस्टिकपासून इंधन निर्मिती असे प्रकल्प कार्यान्वित आहेत. कचऱ्यापासून वीज निर्मितीमुळे ७०० टन सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया होणार आहे. त्यामुळे वाढत्या कचऱ्याची समस्याही मार्गी लागणार आहे. घनकचरा विल्हेवाटीसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित वीजनिर्मिती प्रकल्प डीबीओटी तत्त्वावर उभारण्यात आला आहे.

> “ कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे. या प्रकल्पाची चाचणीही घेण्यात आली. प्रकल्पाच्या उद्घाटनाचे नियोजन सुरू करण्यात आले आहे.
>
> - संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता, पर्यावरण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

त्यासाठी २०८ कोटी ३६ लाख रुपये खर्च करण्यात आला आहे. या प्रकल्पातून कचऱ्यापासून दररोज १४ मेगावॅट वीजनिर्मिती होणार आहे. ही वीज प्रति युनिट पाच रुपये दराने महापालिकेस पुढील २० वर्षे उपलब्ध होणार आहे. त्यामुळे महापालिकेच्या वीज देयकात ४० टक्के बचत होण्याची शक्यता आहे. २१ वर्षे कालावधी असलेल्या या प्रकल्पासाठी स्वच्छ भारत योजनेअंतर्गत ५० कोटींचे अनुदान मिळाले आहे.

## ‘कॉसमॉस’च्या अभ्यासक्रमाचा सहकार क्षेत्राला फायदा

### -डॉ. भागवत कराड यांचे मत


**पुणे :** कॉसमॉस बँकेने सुरू केलेल्या अभ्यासक्रमाचा बँकिंग व्यवसायातील सेवकांना फायदा तर होईलच. पण, भविष्यात सहकार क्षेत्राला फायदा होणार असून, त्याद्वारे देशाची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकाची होण्यासाठी मदत होईल, असे मत केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी शनिवारी व्यक्त केले.

कॉसमॉस बँकेने आपल्या सेवकांसाठी सुरू केलेल्या ‘बँकिंग प्रॉडक्ट मार्केटिंग’ या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाची सुरुवात डॉ. भागवत कराड यांच्या हस्ते करण्यात आली, त्याप्रसंगी कराड बोलत होते. डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष डॉ. रवी आचार्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधी रवींद्र शिंगणापूरकर, जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष अभय माटे, कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे, उपाध्यक्ष प्रवीणकुमार गांधी, ज्येष्ठ संचालक डॉ. मुकुंद अभ्यंकर, श्रीकांत बडवे, ॲड. प्रल्हाद कोकरे, व्यवस्थापकीय संचालिका नयन लगड, मनीषा सबनीस या वेळी उपस्थित होत्या.

कराड म्हणाले, देशाला विकसित राष्ट्र करण्यामध्ये बँकिंग, उद्योग-व्यवसाय आणि सहकार क्षेत्राचा महत्त्वाचा वाटा असेल. त्यासाठी या क्षेत्रांचा वेगाने विकास होणे गरजेचे असून, केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार खाते सुरू केले आहे. कॉसमॉस बँकेने सुरू केलेला हा अभ्यासक्रम इतर सर्व बँकांना उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ते सहकार्य आणि आर्थिक पाठबळ केंद्र सरकारतर्फे देण्यात येईल.

## ज्येष्ठ पत्रकार जोसेफ पिंटो यांचे निधन

**पुणे :** ज्येष्ठ पत्रकार आणि वृत्तपत्रविद्या क्षेत्रातील विद्यार्थिप्रिय प्राध्यापक जोसेफ पिंटो (वय ७२) यांचे अल्पशा आजाराने शनिवारी पहाटे निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, कन्या आणि जावई असा परिवार आहे.



दीपक फर्टिलायझर्समध्ये काही काळ वरिष्ठ पदावर नोकरी केल्यानंतर ज्यो पिंटो यांनी वृत्तपत्र क्षेत्रात आपला ठसा उमटविला. सुरुवातीला संडे ऑब्झर्व्हर या दैनिकात काम केल्यानंतर त्यांनी गोमंतक टाईम्स व महाराष्ट्र हेरॉल्ड या दैनिकांमध्ये मुख्य संपादक म्हणून काम केले होते. त्यानंतर पिंटो यांनी वृत्तपत्रविद्या क्षेत्रात अध्यापन कार्य केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागासह सिंबायोसिस महाविद्यालय, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, नानासाहेब परुळेकर महाविद्यालय येथे विद्यार्थिप्रिय शिक्षक म्हणून त्यांचा नावलौकिक होता. महाविद्यालयीन जीवनापासूनच लोकविज्ञान संघटना या संस्थेमार्फत त्यांनी सामाजिक कार्य केले होते. त्यांच्या पार्थिवावर वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## तब्बल १५ फूट लांबीचा अजगर पुन्हा नैसर्गिक अधिवासात

**पुणे :** बोरज (ता. मावळ) येथे रस्त्याच्या कडेला साचलेल्या पाण्यामध्ये सापडलेल्या तब्बल १५ फूट लांबीच्या अजगराची सुटका करून त्याला पुन्हा नैसर्गिक अधिवासामध्ये सोडण्याची कामगिरी वन्यजीव रक्षक मावळ संस्थेच्या कार्यकर्त्यांनी बजावली. गावाच्या जवळ असलेल्या ओहोळामध्ये लांब प्राणी पडलेला दिसत असून, त्याची हालचाल होत नाही, अशी माहिती वन्यजीवरक्षक, मावळ संस्थेच्या कार्यकर्त्यांना समजली. वन विभागाला संबंधित घटनेची माहिती देऊन, कार्यकर्त्यांचे पथक प्राण्याच्या सुटकेसाठी निघाले. बोरज येथे घटनास्थळी पोहोचताच, हे लांब जनावर म्हणजे तब्बल १५ फूट लांबीचा पूर्ण वाढलेला अजगर असल्याचे लक्षात आले.



काही तरी भक्ष्य गिळले असल्याने या अजगराचे शरीर वाढले असल्याचे दिसले. त्याच्या पोटाकडील भाग फुगीर दिसत होता. त्यामुळेच अजगराची हालचाल अगदी मंद होती. पथकाच्या सदस्यांनी एकत्रित प्रयत्नांनी अजगराचे ते प्रचंड धूड सावकाश उचलले आणि खुल्या जागी आणले. तेव्हा त्याची लांबी तब्बल १५ फूट भरली. अजगराची प्राथमिक आरोग्य तपासणी करून त्याला पुन्हा सोडून देण्याचा निर्णय घेण्यात आला.

हा परिसर लोकांच्या येण्या-जाण्याचा आणि उघड्यावरील असल्याने, तसेच आसपास आदिवासी वस्ती असल्याने अजगराच्या जिवाला धोका संभवण्याची शक्यता दिसली. त्यामुळे वनविभागाच्या परवानगीनुसार या महाकाय अजगराला परिसरातील वनविभागाच्या नैसर्गिक अधिवासात सोडून देण्यात आले.


### PUBLIC NOTICE

Notice is hereby given that the documents bearing original Deed of Apartment dated 24/08/2020 executed between M/s. G. K. Associates through its proprietor Shri Vinod Premchand Chandwani as Vendor and Mr. Shubham M. Kharat and Mr. Hrushikesh M Kharat as purchaser, which is registered in the office of SRO Haveli no. 18 at Sr. no. 8117/2020 has been misplaced and not traceable yet. The report of the same has been lodged at Chatushrungi Police station on dated 28/07/2023 vide report no. 103237-2023. If found, kindly inform MR. UMESH SHALIWAN SONAWANE at B-7, SANSKRIT PRANGAN, BALEWADI ROAD, BANER, PUNE- 411045, mobile no. 8668217091 within next 7 days.

**Description of lost/ misplaced original Documents-**
Deed of Apartment dated 24/08/2020,
Reg. No. 8117/2020, SRO Haveli no. 18
Name- **MR. UMESH SHALIWAN SONAWANE** Date- 28/07/2023
Address- **B-7, SANSKRIT PRANGAN, BALEWADI ROAD, BANER, PUNE- 411045** Place- Pune

POONAWALLA HOUSING FINANCE
Apna Ghar, Apni Pehchan

### पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

(पूर्वीची ‘मॅग्ना हाउसिंग फायनान्स लिमिटेड’ म्हणून ओळखली जाणारी)
नोंदणीकृत कार्यालयः 602, 6 वा मजला, झीरो वन आयटी पार्क, सर्व्हे नं. 79/1 घोरपडी, मुंढवा रोड, पुणे-411036
शाखा कार्यालय : कार्यालय क्रमांक ओंकार प्लाझा, पहिला मजला, एफ 4, राजाराम रोड, बागल चौक, कोल्हापूर, महाराष्ट्र-416001.

**ई-लिलाव विक्री सूचना**

**सर्फेसी कायद्या अंतर्गत सुरक्षित स्थावर मत्तेची विक्री**

आम जनतेस आणि विशेषकरून कर्जदार/ सह कर्जदार/ हमीदारांना याद्वारा सूचना देण्यात येते की मॅग्मा हाऊसिंग फायनान्स लि. कडे, आत्ताची "पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड" ("पीएचएफएल") म्हणून आता दुसरे नाव झाले आहे, मालमत्तेचा **ताबा** सर्फेसी कायद्याच्या कलम 13(4)/ 14 अंतर्गत कंपनीच्या प्राधिकृत अधिकारीद्वारा घेण्यात आला होता, सदर मालमत्तेची विक्री लागू व्याज, आकार व किंमत, इ. सह कंपनीच्या थकित देणींच्या वसूलीकरिता याखाली नमूद केलेल्या अटींच्या अनुसार ई-लिलावाद्वारा करण्यात येणार आहे. वर्णिलेल्या मालमत्तेची विक्री सुरक्षित हित (अंमलबजावणी) नियम (यापुढे नियम म्हणून संदर्भित) च्या नियम 8 व 9 अंतर्गत "जसे आहे जेथे आहे, जे काही आहे तेथे आहे आणि कोणत्याही आधाराशिवाय" या तत्वावर करण्यात येणार आहे. विक्रीच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता, कृपया **www.poonawallahousing.com** या "पीएचएफएल"/ सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

| अ. क्र. | प्रस्ताव क्र. ग्राहकाचे नाव (ए) | मागणी सूचना तारीख व थकित रक्कम (बी) | ताब्याचे स्वरूप (सी) | मालमत्तेचे वर्णन (डी) | राखीव किंमत (ई) | इरठे (राखीव किंमतीच्या 10%) (एफ) | इरठे सादरीकरणाची तारीख (जी) | बोली वृद्धी (एच) | मालमत्तेच्या पाहाणीची तारीख व वेळ (आय) | लिलावाची तारीख व वेळ (जे) | ज्ञात भार/ न्यायालयिन प्रकरणे, जर असल्यास (के) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | कर्ज क्र. HF/0124/H/20/100073 **संकेत तानाजी पोवार (कर्जदार), राणी तानाजी पोवार (सह-कर्जदार) तानाजी शंकरराव पोवार (सह-कर्जदार)** | **सूचना तारीख :** 25/08/2022 **रु. 1064283.16** (रुपये दहा लाख चौसष्ट हजार दोनशे त्र्याऐंशी आणि सोळा पैसे फक्त) दि. 25/08/2022 रोजी नुसार देय सोबत वसुलीपर्यंत चे 15.00% प्र. व. दराने व्याज. | प्रत्यक्ष | पुढील तारण मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे- शॉप क्र. 07, मोजमाप 27.87 चौ. मी. म्हणजे 300 चौ. फू., ग्रामपंचायत मिळकत क्र. 4684, कोणार्क कॉम्प्लेक्स मध्ये पहिल्या मजल्यावर स्थित, गट क्रमांक 1072 मधील प्लॉट क्रमांक 02 वर बांधलेले, ग्रामपंचायत कसाबा कोडोली च्या हद्दीत वसलेले, तालुका पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर. | **रु. 22,83,750/-** (रुपये बावीस लाख त्र्याऐंशी हजार सातशे पन्नास फक्त) | रु. **2,28,375/-** (रुपये दोन लाख अठ्ठावीस हजार तीनशे पंच्याहत्तर फक्त) | 30 ऑगस्ट 2023 रोजी सायं 05.00 वा. पूर्वी | रु. **10,000/-** | 24 ऑगस्ट 2023 (स. 11.00 ते दु. 04.00) | 31 ऑगस्ट 2023 (स. 11.00 ते दु. 02.00) | काही नाही |
| 2. | कर्ज क्र. HF/0124/H/20/100156 **संकेत तानाजी पोवार (कर्जदार), राणी तानाजी पोवार (सह-कर्जदार) तानाजी शंकरराव पोवार (सह-कर्जदार)** | **सूचना तारीख :** 25/08/2022 **रु. 1107120.09** (रुपये अकरा लाख सात हजार एकशे वीस आणि नऊ पैसे फक्त) दि. 25/08/2022 रोजी नुसार देय सोबत वसुलीपर्यंत चे 15.00% प्र. व. दराने व्याज. | प्रत्यक्ष | पुढील तारण मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे - प्लॉट क्र. 02, दुकान क्रमांक 01 मोजमाप 27.87 चौ. मी. म्हणजे 300 चौ. फू. पैकी त्यावर बांधलेले कोणार्क कॉम्प्लेक्स, गट क्रमांक 1072 मध्ये, ग्रामपंचायत कसाबा कोडोली च्या हद्दीत वसलेले, तालुका पन्हाळा, जिल्हा - कोल्हापूर, दुकान क्रमांक 01. | **रु. 22,83,750/-** (रुपये बावीस लाख त्र्याऐंशी हजार सातशे पन्नास फक्त) | रु. **2,28,375/-** (रुपये दोन लाख अठ्ठावीस हजार तीनशे पंच्याहत्तर फक्त) | 30 ऑगस्ट 2023 रोजी सायं 05.00 वा. पूर्वी | रु. **10,000/-** | 24 ऑगस्ट 2023 (स. 11.00 ते दु. 04.00) | 31 ऑगस्ट 2023 (स. 11.00 ते दु. 02.00) | काही नाही |

**खरेदी आणि विक्रीच्या तपशीलांसाठी आणि प्रश्नांसाठी, श्री. शादाब अख्तर यांच्याशी +91 9910453434 वर संपर्क साधा**

स्वारस्य असलेल्या बोलीदार/ खरीददारांना सल्ला देण्यात येतो की त्यांनी लिलावात ठेवलेली मालमत्ता व "पीएचएफएल" शाखेला भेट द्यावी, आणि बोली सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत त्याचे/ तिचे/ त्यांचे समाधान करून घ्यावे तसेच स्वतः चौकशी करावी आणि अतिरिक्त आकार, भार व कोणतही त्रयस्थ पक्षकाराचे हित निश्चित करावेत. मालमत्तेशी सलग्न मालमत्ता कर, विद्युत/ पाणी देय आणि अन्य कोणतीही देणी, जर असल्यास, निश्चित केली पाहिजे आणि/ यशस्वी बोलीदाराद्वारा प्रदान करावयाची आहेत. इच्छुक बोलीदारांनी पोर्टलवर स्वतःची नोंदणी करणे आणि लॉगिन आयडी आणि पासवर्ड आधीच प्राप्त करणे आवश्यक आहे, जे लिलाव सेवा प्रदात्याकडून ई-बोलीसाठी अनिवार्य आहे) सी1 इंडिया प्रा. लि. पत्ता-प्लॉट क्रमांक-68 तिसरा मजला गुडगाव हरियाणा-122003. हेल्पलाइन क्रमांक-7291981124, 25, 26 सपोर्ट ईमेल आयडी- **Support@bankeauctions.com.** संपर्क व्यक्ती-**विनोद चौहान,** ईमेल आयडी- **delhi@c1india.com** संपर्क क्रमांक-9813887931.

**कृपया लक्षात घ्या की,** संभाव्य बोलीदार केवळ त्यांच्याकडूनच ई-लिलावाचे ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात. स्वारस्य असलेले खरेदीदार/ बोलीदारांनी स्तंभ-जी मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणत्याही नॅशनलाईज्ड किंवा शेड्यूल्ड बँकेवर काढलेली "पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड", आयसीआयसीआय बँक लि., खाते क्र. 000651000460; आयएफएससी कोड-आयसीआयसी0000006, 20, आर. एन. मुखर्जी रोड, कोलकाता-700001 यांच्या खात्यात एनईएफटी/ आरटीजीएस/ डीडी द्वारे इसारा रक्कम ठेव (इरठे) जमा करावी. आणि त्यांचे नाव **https://www.bankeauctions.com** वर नोंदवा आणि युजर आयडी आणि पासवर्ड मोफत मिळवा आणि सेवा प्रदात्याकडून ई-लिलावाचे प्रशिक्षण घ्यावे. वेब पोर्टल नोंदणीनंतर, स्वारस्य असलेल्या बोलीदार/ खरीददारांनी अपलोड व ईमेल केलेल्या बोली कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करणे आवश्यक आहे व स्वयं-साक्षांकित प्रत **प्राधिकृत अधिकारी, श्री. तुषार स्वामी यांना पत्ताः 602, 6वा मजला, झीरो वन आयटी पार्क, एसआर नं. 79/1, घोरपडी, मुंढवा रोड, पुणे-411036. मोबा नं. 9673800277, ई-मेल आयडीः tushar.swami@poonawallahousing.com यावर पाठवावी.**

**तारीख** : 30.07.2023 — **प्राधिकृत अधिकारी,** पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड
**स्थळ** : कोल्हापूर (पूर्वीची ‘मॅग्ना हाऊसिंग फायनान्स लि.’ म्हणून ओळखली जाणारी)

equitas SMALL FINANCE BANK LTD

### इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लि.

(पूर्वीची 'इक्विटास फायनान्स लि.' म्हणून ओळखली जाणारी)
कॉर्पोरेट कार्यालयः क्र. 769, स्पेन्सर प्लाझा, चौथा मजला, फेज-II, अंना सलाई, चेन्नई, तामिळनाडू-600002

**ताबा सूचना (नियम 8 (1) अंतर्गत-अचल मालमत्तेसाठी)**

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **मे. इक्विटास स्मॉल फायनान्स बँकेचे** प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील [नियम 3] सह वाचण्यात येणाऱ्या अनु. 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत मागणी सूचना पाठवली ज्यात खाली नमूद संबंधित कर्जदारांना सदर सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या रकमांचा 60 दिवसांच्या कालावधीत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. संबंधित कर्जदार सदर रकमांची परतफेड करण्यात असमर्थ ठरल्याने याद्वारे खाली नमूद कर्जदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8सह वाचण्यात येणाऱ्या सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे. संबंधित कर्जदार आणि सर्व लोकांना याद्वारे सूचित करण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तांच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो मे. इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडच्या खाली नमूद संबंधित रकमेच्या अधिक पुढील व्याज व शुल्कांच्या भाराधीन असेल. 'सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13 मधील उप-विभाग (8) मधील तरतुदीकडे वेधण्यात येते.'

| अ. क्र. | कर्जदाराचे / जामीनदाराचे नाव | सुरक्षित मालमत्तेचे वर्णन (अचल मालमत्ता) | मागणी सूचना तारीख व रक्कम | सांकेतिक ताबा तारीख |
|---|---|---|---|---|
| 1. | **शाखा : ताराबाई पार्क** कर्ज क्रमांक : SETRBAI0356188 **कर्जदार : सौ. अलका प्रकाश कांबळे** **सह-कर्जदार : श्री. प्रकाश सुदाम कांबळे सौ. मंगल सुदाम कांबळे** | पुढील संबंधित मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे- ग्रामपंचायत मूल्यांकन यादी मालमत्ता क्र. 325, एकूण मोजमाप क्षेत्रफळ 1500 चौ. फू., सोबत त्यावर बांधलेले साधे घर, गाव बचनी, ता. करवीर, जिल्हा कोल्हापूर. उत्तरः रस्ता, दक्षिणः पडसर (खुली जागा), पूर्वः नामदेव कांबळे यांची मालमत्ता, पश्चिमः ग्रामपंचायत मिळकत क्र. 324 ची मालमत्ता. मापनः 1500 चौ. फूट., करवीरच्या उप - नोंदणी जिल्ह्यात आणि कोल्हापूरच्या नोंदणी जिल्ह्यात स्थित आहे. | 08 मे 2023 आणि रु. 253951/- | 27 जुलै 2023 |

**दिनांकः** 30.07.2023, **स्थानः** कोल्हापूर — **प्राधिकृत अधिकारी,** इक्विटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड

